
ISSN-2277-4491

# VIBGYOR

Bi-annual Multi Disciplinary Research Journal
Special Issue : April 2018





# VIBGYOR

Bi-annual Multidisciplinary Research Journal
**SPECIAL ISSUE - APRIL 2018**

*The VIBGYOR, a plethora of gem studded writings by eminent scholars from across the globe would genuinely usher a new vigour among the intellectuals in the world. The National and International luminaries in the Editorial Board would synchronize the views penned by renowned scholars from far and wide for publication. The biannual Multi-disciplinary Research Journal extends its canvas to all qualitative writings.*

Editor In Chief
**DR. JOBI GEORGE**
Principal
Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur

Editor
**DR. SUNIL SHINDE**
Associate. Prof. & Head
Dept. of Economics
Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur

Published By
**Research Journal Publication Committee**
Bhiwapur Mahavidyala, Bhiwapur
Accredited with Grade B (CGPA-2.54) by NAAC, Bengaluru
Dist. Nagpur - 441201(M.S.) India
Ph. : No. 07106-232349, 9423602502, 9422829240
E-mail : vibgyorbmv@yahoo.in
Website : www.bgm.ac.in

■ **VIBGYOR**

Bi-annual Multidisciplinary Research Journal
Special Issue - April 2018

■ Published By
**Research Journal Publication Committee**
Bhiwapur Mahavidyala, Bhiwapur
Dist. Nagpur - 441201(M.S.) India
Ph. : No. 07106-232349, 9423602502, 9422829240
E-mail : vibgyorbmv@yahoo.in
Website : www.bgm.ac.in

■ **UGC Approved List of Journals**
**Journal No. 46447**

■ **ISSN-2277-4491**

■ **Special Issue : April 2018**

■ **© Author**
Copyright © All rights are reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrival system or transmitted in any form or by any means electronic, mechanical, photocopying, recording or otherwise without prior permission of the Editor.

The papers included in this publication have been directly reproduced, with minimum editorial intervention, from the files sent by the respective authors. Opinions expressed in the research papers are those of contributors and do not necessarily match the views of Research Journal Committee of the college. The Publisher or Editorial Board is not responsible for any information contained therein.

■ **Type Setting**
**Scan Dot Computer,**
Mahal, Nagpur Mobile : 9822565782
E-Mail : aakar100@gmail.com

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | THE STATUS OF ENGLISH AS A LINK LANGUAGE IN INDIA TODAY: A REVIEW | **Dr. Jobi George** | 7 |
| 2. | Identity and Multiculturalism in Zadie Smith's, 'White Teeth' | **Dr. Vinita S Virgandham** | 12 |
| 3. | Identity, Displacement, and Resilience: Amitav Ghoshs Portrayal of the Colonial Experience | **Dr. Raheel Quraishi** | 18 |
| 4. | A study on Patent awareness among faculties of Engineering Colleges | **Rajasree O.P., Mangala A. Hirwade, Sunilkumar U.T.** | 22 |
| 5. | An Overview of Indian Government Policies in the Agricultural Sector and Farmers' Suicides | **Dr. Mangesh Kadu** | 29 |
| 6. | Physical Fitness: The need of the Era | **Asst. Prof. Aditya Sarwe** | 35 |
| ७. | द्रारिद्र्य निमुर्लन आणि सरकारच्या कल्याणकारी योजना : एक दृष्टीक्षेप | **प्रा. डॉ. सुनिल शिंदे** | ३७ |
| ८. | महाराष्ट्रातील तमाशा : एक लोकनाट्य | **प्रा. डॉ. मधुकर वि. नंदनवार** | ४१ |
| ९. | मानवाधिकार और बुद्ध तत्वज्ञान | **प्रा. डॉ. मोतीराज चव्हाण** | ४६ |
| १०. | नागपुर शहरातील औद्योगिक विकासासाठी कामगारांचे अध्ययन : एक अभ्यास | **प्रा. डॉ. राजेश बहुरुपी** | ५० |
| ११. | आधुनिक काळात मूल्यशिक्षण व्यवसायाची खरी गरज | **प्रा. डॉ. अनिता महावादीवार** | ५३ |
| १२. | धम्मपालनाची मानवी दृष्टिकोनातून वर्तमान उपयोगिता | **सहा. प्रा. सोमेश्वर विनोदराव वासेकर, सहा. प्रा. भिमादेवी महादेव डांगे** | ५७ |

# नागपुर शहरातील औद्योगिक विकासासाठी कामगारांचे अध्ययन : एक अभ्यास

❑ डॉ. राजेश बहुरुपी
वाणिज्य विभाग
भिवापूर महाविद्यालय भिवापूर

**सांराश :**

व्यवसाय संस्था कोणत्याही स्वरूपाची असली तरी प्रत्येक संस्थेसाठी स्त्री व पुरूष कामगाराच्या समस्या नेहमीच अत्यंत महत्त्वपूर्ण समजली जाते. विविध पातळीवर योग्यवेळी योग्य व्यक्तींची कामगार म्हणून नियुक्त केली जाण्यावरच उपक्रमाचे यशअपशय ब-याच मोठया प्रमाणात अवलंबून असते. व्यापार- व्यवसायाची वाढ झाल्यामुळे, कामगार यांना बढती दिल्यामुळे, कामगाराचा मृत्यु किंवा निवृत्ती झाल्यामुळे तसेच, बेजबाबदार कामगार हे कामावरून कमी केल्यामुळे संस्थेत वेळो वेळी नवीन कामगाराची भरती आणि निवड करावी लागते. संघटनेतील उत्पादन कार्यात सातत्य ठेवण्यासाठी साधन सामग्री आणि श्रमाचा पुरवठा अविरतपणे करावा लागतो. व्यापार-व्यवसायाला साधन सामग्री पुरविणे हे तुलनात्मक दृष्ट्या जेवढे सोपे आहे तेवढेच श्रमाचा पुरवठा करणे मात्र कठीण असते. अनुरूप ज्ञान आणि कौशल्ये अवगत असलेल स्त्री व पुरूष कामगाराच्या शोध घेणे हे अत्यंत कठीण कार्य आहे.

प्रस्तुत विषय हा नागपुर शहरातील औद्योगिक विकासासाठी कामगारांचे अध्ययनः एक अभ्यास" असुन या अध्ययना अंतर्गत, कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगार स्त्री व पुरूष यांच्या अभ्यास केला गेला आहे. व्यवसायामुळे त्यांच्या जीवनात झालेले परिवर्तन, त्यांची दिनचर्या, त्यांच्या आकांक्षा व या सर्व घटकांचा, त्यांच्या संपूर्ण जीवनावर पडलेला प्रभाव, हा या अध्ययनाचा विषय आहे.

**प्रस्तावना :-**

वर्तमान युग हे औद्योगिक क्रांतीचे युग आहे. उत्पादन, प्रथम मनुष्य शक्तीच्या आधारे केले जाई, पण औद्योगिक क्रांतीमुळे, उत्पादन क्षेत्रात यंत्राचा शिरकाव होऊन, यंत्राच्या साहाय्याने उत्पादन करण्यात येऊ लागले. औद्योगिक क्रांतीपूर्वी, कामगार हा स्वतःच्या हस्तकौशल्याचा स्वामी होता. माल, उत्पादन, उत्पादित मालावरचे कौशल्य, तसेच त्या मालाची विक्री याबाबतचे, सर्व निर्णय तो स्वतःच घेत असे. औद्योगिक युगात, उत्पादन यंत्राच्या सहाय्याने होत असल्यामुळे, उत्पादनाचा दर्जा उंचावून, मालाचे उत्पादन मुल्य कमी झाले. त्यामुळे, कमी किंमतीतील माल, मोठया संख्येने बाजारात उपलब्ध झाला. परिणामतः मनुष्याने स्वतःच्या हस्तकौशल्याने निर्माण केलेले 'कुशल कारागीरा'चे स्थान डळमळले व त्याला मजुराच्या भूमिकेत जावे लागले. ग्रामीण भागातील कारागीरांना, बहुसंख्येने शहराकडे स्थलांतरित व्हावे लागले. ग्रामीण कारागीर म्हणून आलेले हे कामगार, कारखान्यात मजुर म्हणून काम करू लागले. जो कामगार उत्पादक होता, तो यंत्रचालक बनला.

आजच्या उद्योगधंद्याचे मानवाच्या जीवनावर दुरवर परिणाम झालेले आहेत. उद्योगधंद्यांचा समाजाशी निकटचा संबंध येतो. आधुनिक युगातल्या उत्पादन प्रक्रियेत, मनुष्यबळापेक्षा यंत्रशक्तीवर अधिक भर दिला जातो. औद्योगिक क्रांतीच्या पूर्वीचा श्रमिक, स्वतःच्या कौशल्याचा स्वामी होता. त्याला हवी असणारी साधने, अवजारे, कच्चा माल, उत्पादित मालावरचे कौशल्य व त्याची विक्री याबाबत, श्रमिक स्वतःच निर्णय घेत असे.

श्री व्ही.व्ही. गिरी यांनीही म्हटले आहे की, "औद्योगिक क्रांतीने निरनिराळ्या यंत्राचा वापर होऊन, कमी किंमतीचा माल तयार होऊ लागला. औद्योगिकरणा सोबतच, आपले उत्पादन वाढावे, या दृष्टीने, कारखानदारांनी कमी मजुरी देऊन पुरूष, स्त्रिया व मुले यांना कामावर ठेऊन घेतले."

**अध्ययनायचे उद्धेश :**

नागपुर शहारातील औद्योगिक विकास यंत्रणेतील स्त्री व पुरूष कामगारांचे कुटुंबाचा आवश्यक गरजांवर होणारा खर्चाच्या अभ्यास करणे.

नागपुर शहारात औद्योगिक विकास कामगारांचे सरासरीतील व दरडोई उत्पन्नाच्या अभ्यास करणे.

प्रस्तुत अध्ययन, वर्णनात्मक संशोधन पद्धतीवर आधारित आहे. तसेच संशोधन करतांना, मिळत असलेले निष्कर्ष, हे ज्या क्षेत्रातून अध्ययनाच्या माध्यमातून मिळवायचे असतात, त्या क्षेत्रात प्रातिनिधिक नमुन्याची निवड केली आहे. प्रस्तुत संशोधनाचा विषय, हा "नागपुर शहरात औद्योगिक विकास

यंत्रणेतील कामगारांचे अध्ययन : एक अभ्यास" असल्याने हे अध्ययन नागपुर जिल्हातील बुटीबोरी आणि हिंगणा या ठिकाणी असलेल्या औद्यौगिक क्षेत्रांशी संबंधीत आहे.

**कुटुंबाचा आवश्यक गरजांवर होणारा खर्च :**

अन्न, वस्त्र, निवारा या मनुष्याच्या मुलभूत गरजा आहेत. येथे अन्नात वरण, भात, भाजी, पोळी, दुध यांचाच विचार करण्यात अलेला आहे. कामगार साध्या किंवा मोठ्या हॉटेलातील थालीची अपेक्षा करणार नाही; म्हणून पोटाची भूक भागवू शकणारे अन्नच येथे गृहीत धरण्यात आले आहे. वस्त्रामध्ये अंगावरील कापड व घरी वापरण्याचे सर्व कापड व चादर, गादी, वाकळी या बाबीं विचारात घेण्यात आल्या आहेत. निवाऱ्यात घरासाठी लागणारा खर्च, नळ बिल, विद्यूत बिल, घर टॅक्स इत्यादींचा समावेश आहे. या शिवाय आवश्यक खर्चात भाजीपाला, किराणा, औषधी, शिक्षणावर होणारा खर्च व इतर खर्च ज्यात चपला, जोडे, वाहन दूरूस्ती इत्यादी चिल्लर खर्चाचा विचार करण्यात आला आहे. यावर होणाऱ्या खर्चाची माहिती गोळा केल्यानंतर खालील आकडेवारी प्राप्त झाली.

| दरमहा खर्च | कुटूंबाची संख्या | प्र. श. प्रमाण |
|---|---|---|
| १२०० ते १४०० | ४ | २.१४% |
| १४०० ते १६०० | ५ | २.५७% |
| १६०० ते १८०० | ९ | ४.४३% |
| १८०० ते २००० | १८ | ९.१४% |
| २००० ते २२०० | २५ | १२.२९% |
| २२०० ते २४०० | २९ | १४.४३% |
| २४०० ते २६०० | ३२ | १६.१४% |
| २६०० ते २८०० | ३७ | १८.५७% |
| २८०० ते ३००० | २८ | १४.००% |
| ३००० ते ३२०० | १३ | ६.२९% |
| | २०० | १००% |

**आधार प्रश्नावलीचे वर्गीकरण :**

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, १८.२१ः कुटूंबाचा आवश्यक गरजांवरील मासिक खर्च १२०० ते २००० रू. पर्यंत आहे. ७५.४३ः कुटूंबाचा आवश्यक गरजांवरील मासिक खर्च २००० ते ३२०० रू. आहे. तर ६.२९ः कुटूंबाचा आवश्यक गरजांवरील मासिक खर्च ३२०० पेक्षा जास्त आहे. यावरून स्पष्ट होते की, या कूटुंबांना सरासरी २००० ते ३२०० रू प्रतिमहा मूलभूत गरजांवर खर्च करावेच लागतात.

**निष्कर्ष :**

आर्थिक क्षेत्रात स्त्रियांना नोकरीत स्वतंत्रता आवश्यक वाटते, व त्या स्वतःहि आत्मनिर्भर बनु इच्छितात. पैसा हा, माणसाच्या जीवनात संतुष्टी आणत असतो. जीवन संतुष्ट झाल्यामुळे, मुलांच्या सामाजिकरणा बाबत, स्त्रियांची कठोरता कमी होताना दिसते. प्रस्तुत अध्ययनावरून असे स्पष्ट होते की, श्रमिक महिलांनी घराबाहेर राहून, नोकरी करून, कितीही श्रम केले, तरी घरातील कौटुंबिक जबाबदारीशी, ती पूर्वीइतकीच जोडलेली राहते.

वरील अध्ययनावरून, प्रमुख निष्कर्ष हा निघतो की, संरचनात्मक दृष्टीने कामगार स्त्री व पुरूषांमधील परिवर्तन कमी झाले आहे. मात्र प्रकार्यात्मक क्षेत्रात जास्त बदल आढळून आला आहे. स्त्रियांमधील झालेला हा बदल मुख्यतः 'घराच्या बाहेर पडून काम करणे' आर्थिक स्वातंत्र्य व पाश्चिमात्यीकरणाचा प्रभाव हे आहे. आजचे कामगार स्त्री व पुरूष हा बदल स्वीकारू इच्छितात तसेच पारंपारिक मूल्यांच्या बाबतीही त्या नवीन जीवनपद्धती स्वीकारीत आहेत. औद्योगिक क्षेत्रात यांनी कितीही काम केले, तरी यांचा दर्जा निम्नच राहतो. यांच्या श्रमातून, मालक जास्त नफा कमावतो.

**संदर्भ ग्रंथसुची :**


- डॉ. देशमुख प्रभाकर - विपणन व्यवस्थापन
- डॉ. आगलावे प्रदिप - संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, प्रमोद मुंजे, विद्या प्रकाशन नागपूर.
- डॉ. आगलावे प्रदिप, 'नमुना निवडीचे तंत्र', सामाजिक संशोधन पद्धती, २००७, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर
- डॉ. भांडारकर- रिसर्च मेथॉडॉलॉजी इन सोशिअल सायंस
- डॉ. कविमंडन विजय- कृषी अर्थशास्त्र
- डॉ. बोधनकर, सुधीर, अलोगी विवेक- सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन २०१३
- दास्ताने संतोष - महाराष्ट्र २०००
- सागर के. - कृषी विषयक घटक, के. सागर पब्लिकेशन, पुणे, २७ वी आवृत्ती, २००९
- जाधव तुकाराम - महाराष्ट्र वार्षिकी, २००८-०९, द युनिक ॲकॅडम, पुणे.
- मिश्रा एस. के. आणि पूरी. व्ही. के.- इंडियन इकॉनॉमी,

हिमालया पब्लिसिंग हाऊस, न्यू दिल्ली, २००८
- भोसले के. एम् आणि कारे के. बी.- लोकसंख्या शास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००६
- सावंत प्रकाश- महाराष्ट्राचा भूगोल, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००२.
- समाजवादी प्रबोधनी, इचलकरंजी- महाराष्ट्राचा रौप्यमहोत्सव-कृषी औद्योगिक विकासाची पंचवीस वर्षे- १९८५
- प्राचार्य. उखळकर, अंकेक्षणाचे सिद्धांत, विद्या प्रकाशन
- रा.ना. घाटोळे, समाजशास्त्रीय संशोधन तत्वे पध्दती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, पाचवी आवृत्ती, १९९२, पृ.क्र. २१. श.

★★★